नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०५/२०२५ (मंगळवार)

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## कान्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :– दिनांक २७/०५/२०२५ रोजी कन्हान पोलीस ,पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा कडुन नागपुर कडे टाटा एस वाहनामध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वाघोली फाटयावर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी.टी. ३५८३ हे वाहन नागपुर मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन वाहन चालकाचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **यश मिलन तिवारी, वय २३ वर्षे, रा. मनसर ता. रामटेक** असे सांगितले. वाहनची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ३ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. चालकाला जनावर वाहतुक परवान्याबाबत विचारले असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा** टाटा एस वाहन क्रमांक एम. एच. ४० सी.टी. ३५८३ **किंमती ५ ,००,०००/– रूपये. व ३ गोवंश जनावरे किंमती १८,००० /– रूपयाचा एकुण किंमती ५,१८,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या जनावरांना देखभाली करीता गो विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे.**

**अरोपी नामे यश मिलन तिवारी, वय २३ वर्षे, रा. मनसर ता. रामटेक यांच्या विरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, सह कलम महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोस्टे खापरखेडा हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन खापरखेडाः—** दिनांक २६/०५/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, अण्णामोड ते पंम्पहाउस कोराडी कडे जाणाऱ्या रोडवर विनोद सोमकुवर हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता अण्णामोड ते पंम्पहाउस कोराडी कडे जाणाऱ्या रोडवर साहील लॉन चे बाजुला आरोपी क्रं १) विनोद काशीरावजी सोमकुवर वय ४९ रा. वार्ड क्रमांक ४, खापरखेडा,हा कागदावर आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित असतांना मिळुन आला. आरोपीला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं २) प्रकाश विनायक थोरात रा.वार्ड क्रमांक ४, खापरखेडा याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम १,२३१ /— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले कागद, पेन ,कार्बन, कॅलक्युलेटर ,एक ॲन्ड्रॉईड मोबाईल असा एकुण १३,३३१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी क्रं १)विनोद काशीरावजी सोमकुवर, वय ४९ रा. वार्ड क्रमांक ४, खापरखेडा,आणि आरोपी क्रं २) प्रकाश विनायक थोरात, रा.वार्ड क्रमांक ४, खापरखेडा यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने